
Rayat Shikshan Sanstha's





# D.P. Bhosale College, Koregaon

ISBN: 978-81-927095-5-0

Volume - II

**13th and 14th February, 2017**

## Proceedings of
## A Two Day Interdisciplinary International Seminar
## On
## Geographical & Historical Perspective of Global Problems
## Organized by Departments of History

*Editor*
**Dr. Vijay Vishnu Padalkar**
**D.P. Bhosale College, Koregaon.**

**Chief** *Editor*
**Prin. Dr. V. S. Sawant.**
**D.P. Bhosale College, Koregaon.**



# Index



| Sr. No | Subject | Writer | Page No. |
|---|---|---|---|
| 22 | Recent Trends in E-Marketing in India. | Mr. Pawar Sarjerao Shamrao | 91 |
| 23 | Drought and Its Impact on Mangalwedha Tahsil | Prof. Appasaheb ramchandra birunakd | 95 |
| 24 | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ – एक अभ्यास | प्रा. वसंत ढेरे | 98 |
| 25 | महाराष्ट्रातील आदीवासी समाज आणि समस्या | प्रा. श्रीकांत विकास सिरसाठे | 102 |
| 26 | भारतीय मार्क्सवादीइतिहासलेखक – दा.ध. कोसंबी | प्रा.सुनिल सुखदेव ओव्हळे | 108 |
| 27 | भारतातील 1949 मधील बँकिंग नियमन कायदा एक अभ्यास | प्रा.सौ.कल्पना स.गुजवटे | 110 |
| 28 | भारत आणि पर्यावरणवाद | सहा. प्रा. पाटील पांडुरंग विष्णू | 114 |
| 29 | गोवा मुक्ती आंदोलनातील कोल्हापूर जिल्ह्याची भूमिका | प्रा. पाटील एस. आर. | 117 |
| 30 | पर्यटनातील भारतीय इतिहासाचे महत्त्व | डॉ. नरेकर निवासराव अधिकराव | 119 |
| 31 | Shashi Deshpande's Shorter Fiction-A Move towards Women Emancipation | Dr. Lovleen Bains, | 122 |
| 32 | भारतातील वारसा स्थळे आणि स्मारके यांच्या समस्या : एक आकलन | प्रा. किरण गणपत कुंभार | 125 |
| 33 | मराठेकालीन महाराष्ट्रातील स्त्रिया आणि राजकारण | डॉ. ज्योती कटकर-भगत | 128 |
| 34 | मलकापूर नगरीची ऐतिहासिक पार्श्वभूमी | प्रा. सोनावले गजेंद्र रघुनाथ | 132 |
| 35 | अनाथांची माई सौ.सिंधुताई (सपकाळ ) | डॉ.सुरेश मारुती चव्हाण | 134 |
| 36 | भारतीय स्त्री–समस्या : एक ऐतिहासिक आढावा | श्रीमती. सरकाळे तेजश्री तानाजी | 138 |
| 37 | सातारा शहरातील सामाजिकचळवळी | प्रा. डॉ. संजीव सुरजलाल बोंडवे | 141 |
| 38 | भारतातील डाव्या चळवळीचा उगम | विवेकानंद माने, | 145 |
| 39 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची स्त्रीयांच्या सुधारणेविषयीच्या अडचणी व कार्य | प्रा. डॉ. कोंगडे दत्तात्रय ज्ञानदेव | 149 |
| 40 | श्री क्षेत्र जरंडेश्वरचा चिकीत्सक अभ्यास | सहा. प्रा.क्षत्रिय कमलसिंग विक्रमसिंग | 153 |
| 41 | राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्यांच्याविषयीचे शैक्षणिक कार्य | श्री. आवारी उत्तम सर्जेराव | 157 |
| 42 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज व वि. रा. शिंदे यांची अस्पृश्यतेविरूद्धची चळवळ | प्रा. श्रीमती पी. के. घाटगे | 160 |
| 43 | पन्हाळा किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व | प्रा. डॉ. एम. पी. शिंदे | 162 |
| 44 | अस्पृश्यता निवारण चळवळीतील डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे कार्य | श्री. कृष्णात विलास जाधव | 164 |
| 45 | 'कोल्हापूर जिल्ह्यात पर्यटन व्यवसायाला स्वयंरोजगाराची संधी' | Dr. Kolasekar Manohar Subrav | 167 |
| 46 | संस्कृत भाशेतील नाटके आणि स्त्री–संभाशण | प्रा.डॉ.सौ.पौर्णिमा चंद्रकांत मोटे | 171 |
| 47 | सन १८५७ चा उठाव व सातारा | डॉ. प्रा. सावंत जयपाल चंद्रकांत | 175 |
| 48 | Recent Challenges before Indian Agriculture | Ms. Rani Shinde<br>Dr.Arjun Wagh | 177 |
| 49 | जागतिकीकरण आणि भारतीय राज्यघटना | श्री. आवळे ज्ञानेश्वर शामराव | 182 |

# भारतीय स्त्री–समस्या : एक ऐतिहासिक आढावा

श्रीमती. सरकाळे तेजश्री तानाजी
विदयार्थी

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांना उच्च स्थान दिले आहे. विविध साहित्य कृतीमधून स्त्रियांची आदर्श, उज्जवल प्रतिमा रेखाटली आहेत्र परंतू वस्तूस्थितीमध्ये आजची स्त्री खरच समस्यामुक्त आहे का? आजचा समाज स्त्री – पुरुश समानता या तत्वानुसार खरचं स्त्रीला समान दर्जा देतो का? राज्यघटनेने स्त्रियांना अनेक हक्क व अधिकार बहाल केले आहेत. स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच वैचारिक प्रगती करण्यासाठी ज्ञानाचे कवाडे उघडी केली आहेत. गार्गी, मैत्रियी, रझिया सुलतान, राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, कल्पना चावला, पी. व्ही. सिंधू, साक्षी मलिक इ. महिलांनी वेगवेगळया क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. असे असताना देखील आजच्या स्त्रीला जीवन जगत असताना घरात व समाजात अनेक समस्यांना सामोरे जावं लागत आहे. स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी सतत संघर्श करावा लागत आहेत्र अशा सर्व स्त्रियांच्या समस्यांची मूळे आपणाला इतिहासात पाहावयास मिळतात. स्त्रियांच्या समस्यांना एक वेगळी ऐतिहासिक पार्श्वभुमी आहे. स्त्रियांच्या समस्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी इतिहासातील भूतकाळातील घटनांच्या आधारे या समस्यावर ऐतिहासिक दृश्टीकोनातून प्रकाशझोत टाकणे महत्त्वाचे ठरते.

उद्दिश्टये :–

इतिहासातील विविध घटना, कालखंड यांचा आधार घेवून भारतीय समाजातील स्त्रियांच्या समस्या ऐतिहासिक दृश्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सदरच्या शोध निबंधात त्यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

व्याप्ती :–

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती 'प्राचीनकाळ ते सदयस्थिती' एवढया प्रदिर्घ कालखंडातील आहे. यामध्ये त्या कालखंडातील स्त्रीचे स्थान, रुढी, परंपरा, बंधने तसेच त्यांच्या जीवनातील स्थित्यंतरे याचा आढावा घेतला आहे. विशेशतः महाराश्ट्रातील स्त्रियांच्या समस्याचा ऐतिहासिक दृश्टीकोनातून आढावा घेतला आहे.

विशय विवेचन :–

भारतीय समाजात 'स्त्रियांचे प्रश्न' महत्त्वाचे मानले आहेत. स्त्री जन्मापासून मृत्युपर्यंत अनेकविध समस्यांना सामोरे जाते. वैदिक काळापासून स्त्रियांवर रुढीजात बंधनं, परंपरा, पुरुशप्रधान संस्कृती, इ. कारणामुळे अत्याचार होत आहेत. आजची स्त्री देखील याला अपवाद नाही. आजही आधूनिक युगात स्त्रियांना कमी अधिक प्रमाणात या समस्यांना तोंड दयावे लागत आहे.या समस्या अचानक उद्भवलेल्या नाहीत. त्या सर्व समस्याचे मूळ इतिहासात पाहावयास मिळते. स्त्रियांच्या जन्म, शिक्षण, विवाह, हुंडा, आर्थिक स्वातंत्र्य, असुरक्षितता, हिंसा इ. समस्यामुळे समाज पुन्हा मागसलेपणाकडे झुकू लागला आहे. या सर्व समस्याचा ऐतिहासिक दृश्अीकोनातून उलघडा करणे आवश्यक ठरते.

1. स्त्री – जन्म :–

भारतीय समाजातील पुरुशप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना दुय्यम दर्जा मिळत आला आहे. स्त्री–पुरुश याच्यांत सतत भेदभाव केला जातो. आज २१ व्या शतकात देखील मुलीच्या जन्मामुळे नाराजी व्यक्त केली जाते. मुलींकडे दुर्लक्ष केले जाते. मुलगी नको म्हणून जन्मापूर्वीच तिला गर्भामध्येच मारले जाते. वंशवेल वाढविण्यासाठी मुलीची जन्मापूर्वी तसेच जन्मानंतर हत्या केली जाते. प्राचीनकाळ ते आजही स्त्री जन्मावर नाराजी मोठया प्रमाणावर व्यक्त केली जाते. 'ब्रिटीश काळात स्त्री मृत्युदर


ISBN NO. 978-81-927095-5-0

बाल्यावस्था व प्रजननकाळात मोठया प्रमाणावर होता.1 या सर्व गोश्टीना बालविवाह, अज्ञान, रुढी व परंपरा, आर्थिक मागासलेपणा कारणीभूत होता. 'बाल हत्या व भ्रुणहत्या थांबवण्यासाठी महात्मा फुलेनी 'बालहत्या प्रतिबंधक ग्रहाची स्थापना 1968' मध्ये आपल्या स्वतःच्या घरातच केली. 2

2. स्त्री शिक्षण :–

स्त्रियांना प्राचिन काळापासूनच मर्यादित प्रमाणात शिक्षण दिले जात होते. लोपामुद्रा गार्गी, मैत्रियी, दमयंती, बलश्री, व प्रभावती याविविध क्षेत्रातल्या कर्तबगार स्त्रिया होत. तत्कालीन शिक्षणाच्या संधीमुळे त्या कर्तृत्व दाखवू शकल्या. 3 परंतू पुढे उत्तर वैदिक कालखंडानंतर स्त्री शिक्षणावर बंधने आली. स्त्रिया पुरूशांच्या बरोबरीने शिकल्यातर त्या बरोबरीचे हक्क मागू लागतील ही भितीहोती. आजही मुलींना ग्रामिणभाग, आदिवासी विभाग, मागास राज्ये येथे शिक्षणास मज्जाव केला जातो. ब्राम्हणांनी आपल्या स्वार्थसाठी स्त्री शिक्षणाला विरोध केला. स्त्री शिक्षणाचा संबंध त्यांच्या अनितीमान होण्याशी, विधवा होण्याशी जोडून ज्ञानाची दारे त्यांच्यासाठी बंद करून ठेवली. 4 आज शिक्षण मिळत आहे परंतू योग्य संधी उपलब्ध करून दिली जात नाही. ग्रामीण भागात आजही, प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा याच्या नावाखाली मुलींचे शिक्षण बंद केले जाते. स्त्री शिक्षणासाठी म.फुले, महर्शी कर्वे, पंडित रमाबाई इत्यादीनी यशस्वी प्रयत्न करून स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली यामुळेच आजची स्त्री यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचली आहे.

3. विवाहविशयक समस्या :–

वैदिक काळापासून समाजात आठ प्रकारचे विवाह रूढ होते. आरंभीच्या वैदिक काळात प्रौढ विवाह व मुलीच्या मतस्वतंत्र्याला प्राधान्य होते मात्र त्यानंतर बालविवाह प्रथा सर्वत्र सुरू झाली. आजही अनेक राज्ये, आदिवासी व मागासभागात असे बालविवाह घडून येतात. यामुळे स्त्री शिक्षण व स्वातंत्र्य संपुश्टात आले. ' विवाह 'हा मानवी समाजव्यवस्थेतील महत्त्वाचा संस्कार आहे. 5 विवाहकरताना आजही मुलीचे वय विचारात घेतल जात नाही. तसेच विवाह आजही मान्य केले जात नाहीत. आजही जोडीदाराचे वय व निरक्षरता यामुळे विचारात पडणाऱ्या फरकाने नवशिक्षितांच्या मनाची कुचंबना होते आहे हे ओळखून त्या काळी आप्पासाहेब किर्लोस्करांनी " सौभद्र " नाटकात सुभद्रेला तिच्या इच्छेनुसार अर्जुनाशी विवाह करण्यासाठी कृश्णाने प्रयत्न केले हे दाखवले आहे. 6

4. हुंडाबळी :–

आज समाजात मोठया प्रमाणावर हुंडासमस्या वाढत आहे. कायदयाने हुंडा देणे व घेणे हा गुन्हा आहे. हुंडाबळी प्रतिबंधक कायदा 1961 नुसार हा गुन्हा आहे. 7 पूर्वी स्त्रीधन आणि वरदक्षिणा या रुपात मुलीबरोबर दासदासी, गोधन, सोने–चांदी पाठवली जाई त्यानंतर स्त्रियांवर अनेक बंधने आली म्हणून हे स्त्रीधन तिचा उपजिविकेचे साधन झाले, स्त्रियांचे न्युनत्व, अज्ञान, कुरूपता झाकण्यासाठी संपत्तीची लालूच दाखवली गेली यातूनच एक दुश्ट प्रथा निर्माण झाली यात सुशिक्षित व आशिक्षित असा भेद नसून माणसाला धन माणणारे व धनाला प्राण माणणारे दोन भेद समाजात आहेत. 8 हुंडयाच्या समस्येमूळे मुलगी म्हणजे संकट अशी नकारात्मक भावना आजही समाजात आहे. माहेरहून पुरेसा पैसा न आणल्याने सासरच्या मंडळीकडून मुलीचा छळ केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात बंगाल प्रांतात कोणा एका 'स्नेहलता'नावाच्या मुलीने आई–वडिलांचे हुंडयापायी होणारे हाल चुकविण्यासाठी अंगावर रॉकेल ओतून स्वतःला पेटवून दिले. अशा हृदयद्रावक अनेक घटना इतिहासात आहेत. 9

5. स्त्रियांकडे पाहण्याचा नकारात्मक दृश्टीकोन :–

स्त्रीजन्मापासून तिच्याकडे पाहण्याचा दृश्टीकोन नकारात्मक असतो. मुलीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष, आरोग्याची हेळसांड, विवाहाची घाई, रूढीजात बंधने, समाजातील दृश्ट प्रवृत्ती या सर्व गोश्टीमूळे आज समाजात स्त्रियांच्या समस्या प्रकर्शाने जाणवत आहेत. हा नकारात्मक दृश्टीकोन पिढयान–पिढया चालत आला आहे. इतिहासाची पाने मागे उलटून पाहताना या गोश्टी

प्रकर्शाने जाणवतात स्त्रियांना स्वतःच्या घरामध्ये 'दासी' म्हणून वागणूक दिली जाते. 1882 मध्ये ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरूश तुलना' या पुस्तकातून स्त्रियावरील अन्यायाला वाचा फोडताना सर्वसामान्य पुरूश यांना उद्देशून शिवराळ भाशाही वापरली आहे.10

6. आर्थिक क्षेत्रातील समस्या :–

आज स्त्रियांनी विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचे स्वतंत्र ठसे उमटवेले आहेत. स्वतः अर्थाजन करत असताना स्त्रिला आज अनेक समस्या भेडसावत आहेत. स्त्री–पुरूश श्रमविभागणी, वेतनातील भेदभाव, कामाच्या ठिकाणी मानसिक ताणतणाव अशा अनेक गोश्टींना महिला ग्रस्त आहेत. स्त्रियांच्या अंतःसामार्थ्याचा संपुर्ण विकास होण्यासाठी त्यांना संधी मिळणे आवश्यक आहे. आज स्त्रियांना संधी उपलब्ध असूनही सामाजिक मानसिकता, स्त्रियांकडे बघण्याचा संकुचित दृश्टीकोन, स्त्री असुरक्षितता या कारणामूळे स्त्रिया आर्थिक विकारात म्हणावे असे आपले योगदानेदेण्यास पात्र होत नाहीत. प्राचीन काळातही कामाच्या ठिकाणी नेहमी असा छळ होत असे मजूर, दासी म्हणून कामे करावी लागत कधीकधी या स्त्रिया मालकाच्या हाव्यासाला देखील बळी पडत होत्या. 11

7. स्त्री हिंसाः–

भारतीय संस्कृतीतील पुरूशप्रधान संस्कृती मुळे स्त्रीला दुय्यम व गृहीत धरले गेले. समाजातील मनुप्रवृत्ती स्त्रियांना घातक ठरली. परकीय आक्रमणामुळे स्त्री पावित्र्य, अस्तित्व व रक्षणाचे प्रश्न उभे राहीले स्त्रियांना मारहाणीचे प्रकार समाजात आजही नित्याचे आहे. लाखो निरपराध स्त्रिया आज कायदयाचे संरक्षण असून देखील असे अन्याय सहन करत आहेत. समाजाची भिती, खोटी प्रतिश्ठा, रूढी व परंपरेने जखडल्यामुळे स्त्रियांनी खूपच कमी प्रमाणात विरोध केल्याचे दिसून येते. स्त्रियांचे असे शोशित रूप आपणास प्राचीन काळापासून पाहावयास मिळते. वेदोत्तरकाळ, पेशवे कालखंड, ब्रिटीश कालखंड या काळात स्त्रिया मोठया प्रमाणात हिंसेला बळी पडत होत्या अशा स्त्रियांना आधार देऊन त्याचे भविश्य सुधारण्याचे धाडस अनेक समाज सुधारकांनी केले आहे. काशीबाई कानिटकर म्हणतात "स्त्रीने पुरूशशी बोलणे म्हणजे अपमान वाटे. घरातील सासुरवाशिणींना मृदुंगाप्रमाणे दोहोंकडून थापटया मिळावयाच्या."12

8. महिला असुरक्षितता :–

आज स्त्रियांनी स्वकर्तृत्वावर यशाची उत्तुंग शिखरे काबीज केलेली आहेत. असे असताना देखील आज स्त्री समाजात सुरक्षित आहे का ? असा प्रश्न पडतो. घराबाहेर पडलेली मुलगी, महिला परत घरी नीट येईल का ? असा प्रश्न घरच्यासमोर असतो. भारतीय समाजात असलेल्या योनीशुचितेच्या अतिरेकी महत्वामुळे स्त्रिया बळी पडताना दिसत आहेत. बलात्कार, लैंगिक शोशण व छळ इ. गोश्टींना आज खूपस्त्रिया बळी पडत आहेत. समाजातील पुरूशी अहंकार, अनैतिक वासना, संकुचित दृश्टीकोन स्त्री म्हणजे उपभोगाचे साधन यामुळे महिला असुरक्षित आहेत याचे पुरावे आपणास इतिहासात देखील पाहावयास मिळतात. परकीय आक्रमकांच्या काळात स्त्री पावित्र्य, स्वातंत्र्य, अस्तिव धोक्यात आले. हजारो स्त्रियांनी अल्लाउद्दीनच्या विटंबनेतून मुक्त होण्यासाठी जोहर केला.13 पुरूशा व्याभिचाराला बळी पडलेल्या स्त्रियांना समाजात स्थानननव्हते. तिची चूक नसतानाही दोश मात्र तिला दिला जाई महात्मा फुलेंनी अशा पीडीत स्त्रियांना आश्रय दिला पंडिता रमाबाईनी शारदाश्रमने येथे अशा पीडीत स्त्रियाच्या सुरक्षिततेसाठी एक पाऊल उचलले. 'पतित स्त्रियांना वेशीबाहेर घालवून कोल्हया–कुत्र्यांकडून खाववावे अशी स्मृतीकारांची राजाला स्पश्ट आज्ञा आहे.'14 पंडिता रमाबाईचे हेवकतत्व शारदा–सदनाच्या स्थापनेच्या वेळचे 1889सालाचे आहे.

सारांश –

भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्रियांचे दुय्यम स्थान व समस्या हया प्राचीन काळापासून समाजामध्ये असल्याचे दिसते. 21व्या शतकातील स्त्रीविशयक समस्यांचे मुळ हे इतिहासातच असले तरी याच इतिहासातून या समस्यांचे उच्चाटन करण्यासाठीचे अनेक दाखले मिळाले आहेत. अनेक समाज सुधारक, संस्था, साहित्यिक यांनी स्त्री विशयक समस्यांना वाचा फोडून समस्यांची मूळ कारणे शोधली व तोडगाही सुचविला.

तसेच त्या तोडग्याची अंमलबजावणी करण्याचे यशस्वी प्रयत्न देखील केले आहेत. भारतीय स्त्रीयांचे विशेशतः महाराश्ट्रीयन स्त्रीयांच्या समस्या जाणून घेवून मध्य युगात छत्रपती शिवाजी महाराज, आधुनिक काळात महात्मा फुले, महर्शी कर्वे, पंडीता रमाबाई इत्यादींनी अविरत प्रयत्न केले. 'इतिहास ही घटनांची साखळी आहे.' इतिहासाची पुनरावृत्ती होत असते यामुळे स्त्रीयांच्या समस्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी इतिहासाचाच आधार घ्यावा लागतो.

निश्कर्श –

1. स्त्री जन्म, स्त्री शिक्षण, विवाह, हुंडा प्रथा, स्त्री हिंसा व असुरक्षितता इत्यादी विशय अभ्यासताना इतिहासाचाच आधार घेवून त्या प्रभावीपणे समाजासमोर मांडता येतील.
2. महिलांची असुरक्षितता, स्त्रियांचे लैंगिक शोशण, मानवी चंगळवाद इत्यादी समस्यांनी आजचे समाज जीवन गढूळले आहे. इतिहासाच्या आधारे या समस्यांच्या समूळ उच्चाटनासाठी समाज मनाला विचार प्रवृत्त करता येईल.
3. इतिहासातील विविध दाखल्यांच्या माध्यमातून स्त्री जीवन व समस्या यावर मात करुन स्त्री सक्षमीकरणाचे महत्त्व पटवून देता येईल.
4. प्रत्येक समस्येचे मुळ हे इतिहासातच असून त्यावर उपाय देखील इतिहासातच दिलेले आहेत.

संदर्भ ग्रंथ –

1. अनंतराम शरयु, वंडसे उमा, भारतीय समाजातील स्त्रीयांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1987 पृश्ठ क्र.– 9
2. कीर धनंजय, महात्मा फुले यांचे चरित्र, प्र.आ.1973 पृश्ठ क्र. 98
3. जोशी पी.जी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विदया प्रकाशन, नागपूर, 2003 पृश्ठ क्र.229
4. रानडे प्रतिमा, स्त्री प्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक, पदमगंधा प्रकाशन, पुणे, मार्च 2005 पृश्ठ क्र. 14
5. क्षीरसागर श्री. के., स्त्री जीवन आणि विवाह विशयक लेख संग्रह, महाराश्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मार्च 1992, पृश्ठ क्र. 166
6. किर्लोस्कर आप्पासाहेब, रामराज्य वियोग, 1884 पृश्ठ क्र. 4
7. अनंतराम शरयु, वंडसे उमा, भारतीय समाजातील स्त्रीयांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1987 पृश्ठ क्र.– 52
8. क्षीरसागर श्री. के., स्त्री जीवन आणि विवाह विशयक लेख संग्रह, महाराश्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मार्च 1992, पृश्ठ क्र. 188
9. रविवारची लोकसत्ता प्राप्त संवाद वर्श 2 क्र. 12 3 एप्रिल 1955, पृश्ठ क्र. 5
10. संपा. मालशे स.ग., स्त्री–पुरुश तुलना, ताराबाई शिंदे कृत प्रथम प्रकाशन 1882 द्वि. आ. 1985 प्रस्तावनेवरुन
11. अनंतराम शरयु, वंडसे उमा, भारतीय समाजातील स्त्रीयांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1987 पृश्ठ क्र.– 70,71
12. संपा. वैदय सरोजिनी, काशीबाई कानीटकर, आत्मचरित्र आणि चरित्र, प्र.आ. 1980, पृश्ठ क्र. 130
13. जोशी पी.जी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विदया प्रकाशन, नागपूर, 2003 पृश्ठ क्र.228
14. टिळक दे.ना., तेजस्विनी पंडिता रमाबाई, 1960 पृश्ठ क्र. 136


ISBN NO. 978-81-927095-5-0



# Certificate



Rayat Shikshan Sanstha's,

# D. P. Bhosale College, Koregaon

( NAAC Accredited with 'B' Grade)

## A TWO DAY INTERDISCILINARY INTERNATIONAL SEMINAR

ON

**"Geographical & Historical Perspective of Global Problems"**

**13th and 14th February, 2017**

This is to certify that Dr./Mr./Mrs./Miss/Shri....Sarkale Tejashri Tanaji............
Research student, Chh. Shivaji College College/University has participated in a Two Day Interdiscplinary International Seminar on **"Geographical & Historical Perspective of Global Problems"** organized by Departments of Geography and History in collaboration with Maharashtra Bhugolshastra Parishad, Pune and Shivaji University History Conference, Kolhapur held at Rayat Shikshan Sanstha's, D. P. Bhosale College Koregaon, Dist. - Satara (Maharashtra) on 13th and 14th February, 2017 as a Resource Person/ Chair Person/ Paper Presenter/ Participant. He/She has presented a research paper entitled भारतीय स्त्री- समस्या : एक ऐतिहासिक आढावा।........

Dr. Gatade D.G.
Organizing Secretary

Dr. Padalkar V.V.
Coordinator

Dr. Sawant V. S.
Principal

Prof. Dipak Guray